**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ**
**धुळे विभाग धुळे**

जा.क्र.राप/विनिधु/आरथा/ ९८३१

**कालमर्यादा**

दिनांक २४/०५/२०२४

प्रति,
मा.संचालक ,
शिक्षु प्रशिक्षण मंडळ, पश्चिम प्रदेश,
नवी प्रशासकीय इमारत, दुसरा मजला,
सायन-ट्रॉम्बे रोड मुंबई-२२

मा.सहाय्यक संचालक ,
रोजगार व स्वयंरोजगार विदयापीठ,
रोजगार व स्वयंरोजगार माहिती व
मार्गदर्शक केंद्र विद्यापीठ आधार,
गणेश खिंड पुणे-७

मा.जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी,
जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार कार्यालय,
जुने जिल्हाधिकारी इमारत, धुळे.

मा.रोजगार व स्वयं रोजगार अधिकारी,
जिल्हा रोजगार व स्वयं रोजगार
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
टोकरतलाव रोड, नंदुरवार जि.नंदुरवार.

प्रति,
मा. प्राचार्य,
.औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नंदुरबार.

मा.प्राचार्य,
.औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
देवपूर धुळे.

मा.अशंकालीन प्राचार्य,
व्दारा-औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
देवपूर धुळे.

मा.प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
नंदुरवार जि.नंदुरवार.

गर्व्हरमेट इंजिनिअरींग कॉलेज जळगाव.
गर्व्हरमेंट पॉलीटेकनिक कॉलेज धुळे
गर्व्हरमेट इंजिनिअरींग कॉलेज पुणे.

विषय - एप्रिल- २०२४ सत्रासाठी कार्यशाळेकडील तांत्रिक / अभियांत्रिकी
या व्यवसायातील शिकाऊ उमेदवार भरती.

महोदय,

.अपैन्टिस ॲक्ट १९६१,१९७६,१९८६ नुसार या विभागात **एप्रिल- २०२४** या सत्रासाठी कार्यशाळेकडील तांत्रिक/ ,अभियांत्रिकी या व्यवसायातील शिकाऊ उमेदवारांची भरती करावयाची आहे. त्यासाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता, भरावयाच्या जागा, वयोमर्यादा, प्रशिक्षण कालावधी इत्यादी बाबीच्या खालील प्रमाणे उल्लेख करण्यात आलेला आहे.

| .अ.क्र | व्यवसायाचे नाव | भरावयाच्या जागांची संख्या | शेक्षाणिक पात्रता | वयोमर्यादा दि. २२.०५.२०२४ पर्यंत. |
|---|---|---|---|---|
| | **.अ) कार्यशाळेकडील व्यवसाय** | | | |
| १ | इंजिन कारागीर (मोटार मेकॅनिक व्हेईकल ) | ६५ | एस.एस.सी पारा व आय.टी.आय. मोटार मेकॅनिक व्हेईकल कोर्स पास. | १६ ते ३३ वर्षे (५ वर्षे मागासवर्गायांसाठी शिथिलक्षम) |
| २ | इंधन कारागीर (डिझेल मेकॅनिक) | ६४ | एस.एस.सी पास व आय.टी.आय. डिझेल मेकॅनिक कोर्स पास. | |
| ३ | पत्रे कारागीर (मोटार व्हेईकल बॉडी फिटर) | २८ | एस.एस.सी पास व आय.टी.आय. शिटमेटल कोर्स पास. | |
| ४ | सांधाता (वेल्डर) | १५ | एस.एस.सी पास व आय.टी.आय. वेल्डींग कोर्स पास. | |
| ५ | ईलेक्ट्रीशन (वीजतंत्री) | ८० | एस.एस.सी पास व आय.टी.आय. ऑटोमोबाईल इलेक्ट्रॉनिक्स कोर्स पास. | |
| ६ | कातारी (टर्नर) | २ | एस.एस.सी पास व आय.टी.आय. टर्नर कोर्स पास. | |
| | **ब) अभियांत्रिकी व्यवसाय** | | | |
| १ | .अभियांत्रिकी (यांत्रिकी) किंवा मोटार पदवीधर (बी.ई.) | २ | .अभियांत्रिकी मधील यांत्रिक/ॲटो मोबाईल या व्यवसायातील पदवीधर (बी.ई) यांत्रिक/ॲटोमोबाईल इंजिनियरींग पदवीकाधारक कोर्स पास आवश्यक. | १६ ते ३३ वर्षे (५ वर्षे मागासवर्गायांसाठी शिथिलक्षम) |

**टिप**- अभियांत्रिकी पदवीधर ॲटो मोबाईल इंजिनियरींग पास उमेदवारांची नावे आपणाकडे नोंदणी केलेली नसल्यास पदविकाधारक यांत्रिक /ॲटो मोबाईल इंजिनियरींग पास उमेदवारांची यादी पाठविण्यात यावी.

वरील व्यवसायातील नांव नोंदणी केलेल्या पात्र उमेदवारांची १:१० या प्रमाणात यादी नांवे पत्तेसह व्यवसाय निहाय या कार्यालयाचे पत्र मिळाल्यापासून ७ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करणे आवश्यक आहे. त्या नंतर पाठविण्यात आलेल्या यादयांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोद घ्यावी.

अनुसूचित जाती, जमाती या प्रवर्गासाठी शिकाऊ उमेदवारांचे प्रमाण महाराष्ट्रासाठी १:१७ असे आहे. तसेच शिकाऊ उमेदवार भरती संबंधी परिपत्रकात आरक्षण देण्यात आलेले नसल्याने आपल्या कार्यालयाच्या नियम प्रमाणे उमेदवारांची यादी पाठविण्यात यावी.

वरील प्रमाणे व्यवसायनिहाय उमेदवारांची यादी दिलेल्या मुदतीत प्राप्त न झाल्यास रा.प.सेवेत असलेले व रा.प.सेवेतुन सेवा निवृत्त झालेल्या धुळे विभागातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची प्राप्त झालेल्या अर्जातून भरती करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

तसेच सरकारी अथवा खाजगी कंपनीत एकदा शिकाऊ उमेदवारी कायदयानुसार शिकाऊ उमेदवारी केली असल्यास व अभियांत्रिकी (यांत्रिकी) ॲटो मोबाईल पदवीधर/पदविकाधारक, जर ३ वर्षापूर्वी परीक्षा पास झालेले असतील अशा उमेदवारांचा यादीत समावेश करण्यात येऊ नये.

उमेदवाराने रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र कार्यालय/ समाजकल्याण कार्यालय/एकात्मिक आदिवासी प्रकल्प अधिकारी कार्यालय इ. अधिकृत संस्थेत नांव नोंदणी करणे आवश्यक आहे.अर्जासोबत नोंदणी पत्राची झेरॉक्स प्रत जोडण्यात यावी.

उमेदवारांने अलिकडे काढलेला स्वतःचा पासपोर्ट साईजचा फोटो अर्जावर चिकटवून सही करणे आवश्यक आहे. तसेच शिकाऊ उमेदवार म्हणून निवड झालेल्या उमेदवारांना शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ अन्वये शिकाऊ उमेदवारी सुधारित कायदा १९७३ व १९८६ अन्वये करारनामा प्रशिक्षण पूर्ण होण्यापूर्वी लिहून द्यावा लागेल तसेच प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी जिल्हा शल्य चिकित्सक,धुळे यांचेकडून वैद्यकीय तपासणी करुन येईल. त्यात पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच शिकाऊ उमेदवारी करिता बोलविण्यात येईल.

प्रशिक्षण पूर्ण होण्यापूर्वी सदर उमेदवाराने कोणत्याही कारणास्तव प्रशिक्षण अर्धवट सोडल्यास शिकाऊ उमेदवारी अधिनियम १९६१ नुसार योग्य ती नुकसान भरपाई द्यावी लागेल.शिकाऊ उमेदवारी निवडकरिता वरील व्यवसायाकरिता वयोमर्यादा दि. २२/०५/२०२४ रोजी करणे आवश्यक राहिल.वरील उमेदवारांचा प्रशिक्षण कालावधी हा एक वर्षाचा राहिल.

प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर उमेदवारांना म.रा.मा.प.महामंडळाचे सेवेत सामावून घेण्यात येणार नाही. तसेच रा.प.सेवेत सामावून घेण्याबाबत कोणताही हक्क राहणार नाही. यांची संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सदर फॉर्म या कार्यालयास प्राप्त होतील. खुल्या प्रवर्गासाठी **रुपये ५००/-** व मागासवर्गीयांसाठी रुपये २५०/- चा डिमांड ड्रॉप्ट किंवा इंडियन पोस्टल ऑर्डर " एम.एस.आर.टी.सी. फंड अकौन्ट पेयबल ॲट धुळे " या नावाने उमेदवारांना काढावा लागेल. अर्ज सादर करणार्या उमेदवारांकडे स्टेट बँक ऑफ इंडिया या शाखेत असणे आवश्यक आहे. अर्जासोबत बँक पासबुक ची झेरॉक्स प्रत सादर करणे आवश्यक आहे.

विहित नमून्यातील अर्ज विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, धुळे विभाग येथे कार्यालयीन वेळेत शनिवार, रविवार व सुटीचे दिवस सोडून दिनांक ०६.०६.२०२४ पर्यंत ठिक ११.०० ते १३.०० वाजेपर्यंत मिळू शकतील संपूर्ण भरलेले अर्ज दिनांक ०६.०६.२०२४ पर्यंत ठिक १०.०० ते १७.०० वाजेपर्यंत स्विकारले जातील. दिनांक ०६.०६.२०२४ ही भरलेले अर्ज स्विकारण्याची अंतिम मूदत राहील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू,

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन, धुळे विभाग धुळे.

प्रत मा.महाव्यवस्थापक (क.व.औ.सं.) रा.प.मध्यवर्ती कार्यालय मुंबई -८.

विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन, धुळे विभाग धुळे.